वडार समाजाच्या लोकांच्या आर्थिक उन्नतीसाठी विशेष योजना सुचविण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीस मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन

इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती,
भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग ,
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण २०१९/प्र.क्र.२६ (भाग-१)/महामंडळे

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९

<u>वाचा</u> :- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्र.शासाउ-१०१०/प्र.क्र.९६/१०/सा.उ., दि.१३.०३.२०१२
२) शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र क्र. वनाम २०१७/प्र.क्र.८७/महामंडळे, दि.२८ जानेवारी,२०१९
३) शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.२६/महामंडळे, दि.२२ फेब्रुवारी,२०१९
४) शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.२६/महामंडळे, दि.२ मार्च,२०१९
५) शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.२६/महामंडळे, दि.८ मार्च,२०१९
६) शासन निर्णय, विजाभज, इमाव व विमाप्र क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.२६ (भाग-२)/ महामंडळे, दि.११ जून, २०१९

<u>प्रस्तावना :-</u>

वडार समाजाच्या लोकांच्या आर्थिक उन्नतीकरीता विशेष योजना सुचविण्यासाठी वाचा क्र. ३ येथे नमूद दि.२२.०२.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठीत करण्यात आली होती. वाचा क्र.४ येथे नमूद दि.०२.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर समितीच्या अध्यक्षपदी श्री.विजय लक्ष्मण चौगुले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे वाचा क्र.५ येथे नमूद दि.०८.०३.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर समितीचे अध्यक्ष श्री.चौगुले यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा प्रदान करण्यात आला आहे. तसेच वाचा क्र.६ येथे नमूद दि.११.०६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये समितीस दि .२२ ऑगस्ट, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर समितीस मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

श्री.विजय लक्ष्मण चौगुले (राज्यमंत्री दर्जा), यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य वडार समन्वय समितीस दि.२२ ऑगस्ट, २०१९ पासून पुढील ०३ महिने म्हणजेच दि.२२ नोव्हेंबर, २०१९पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात येत आहे.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८१६३५३८३४२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RAVINDRA VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d853d93c38d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC AND SBC DEPT, o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA VASANTRAO GURAV
Date: 2019.09.18 16:41:56 +05'30'

(रविन्द्र गुरव)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपरन मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.मंत्री (इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग), मंत्रालय, मुंबई
३) मा.राज्यमंत्री (इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग), मंत्रालय, मुंबई
४) मा.प्रधान सचिव (इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग), मंत्रालय, मुंबई
५) श्री.विजय लक्ष्मण चौगुले, अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा), महाराष्ट्र राज्य वडार समन्वय समिती, वडार भवन, प्लॉट नं.७ बी, सेक्टर नं.१७, सानपाडा, नवी मुंबई -४००७०३
६) उप संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे/ नाशिक/ औरंगाबाद
८) व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्या., मुंबई
९) सहायक आयुक्त, समाज कल्याण, पुणे
१०) निवडनस्ती.